महाराष्ट्र शासन
शासकीय परिवहन सेवा
सर पोचखानवाला मार्ग,वरळी,मुंबई,

दूरध्वनी :- ०२२-२४९३ १८५६ /०२२-२४९३ २९७२ / ०२२-२४९३ ९५५३ / ई.मेल -gts.worli@gmail.com

---

जा.क्र.-झेरोक्स मशीन से.सं /२०२५/प्र.क्र.१६ /कार्या-र.व.का/ ८७० दिनांक :- ०६/०६/२५

महोदय ,

शासन निर्णय वित्त विभाग, क्र.विअप्र२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग-२ दि १७/०४/२०१५ भाग पहिला उप विभाग दोन मधील अ.क्र.२६ ब , नियम क्र.७६ नुसार प्राप्त वित्तीय शक्तीनुसार प्रादेशिक कार्यालय प्रमुख म्हणून प्रदान केलेल्या प्राधिकारान्वये नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांना कार्यालयीन दैनंदिन कामकाजाकरिता २ नग मोठी झेरोक्स मशीन (मल्टी फंक्शन) भाडेतत्वावर घेणे अनुज्ञेय आहे.

शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई. येथील कार्यालयात भाडेतत्वावर २ नग झेरोक्स मशीन (मल्टी फंक्शन) दि. ०१/०७/२०२५ ते दि. ३०/०६/२०२६ या कालावधीकरिता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वार्षिक सेवा संविदा करार करणे प्रस्तावित आहे. शासकीय परिवहन सेवा ,वरळी ,मुंबई येथील सूचना फलकावर सदर जाहिरातीचा मसुदा लावण्यात येईल.

| अनु.क्र. | दरपत्रके प्रक्रिया | तपशील |
|---|---|---|
| १ | दरपत्रक उपलब्ध होण्याची तारीख व वेळ | दि. ०९/०६/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| २ | शा.प.सेवा कार्यालयात दरपत्रके जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ | दि. १७/०६/२०२५ दुपारी ०३.०० वाजता |
| ३ | शा.प.सेवेत मा.नियंत्रण कक्षात दरपत्रके उघडण्याची तारीख व वेळ | दि. १७/०६/२०२५ संध्या. ०४.०० वाजता |
| ४ | दरकराराचा कालावधी | दि. ०१/०७/२०२५ ते दि. ३०/०६/२०२६ |

**दरकरार नमुना (आपल्या लेटरहेडवर देणे)**

| अनु.क्र . | तपशील | रक्कम रु./पैसे | वस्तू व सेवा कर १८% | एकूण रक्कम रु./पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | प्रती नग A-४ साईझ | | | |
| २ | प्रती नग A-३ साईझ | | | |

## अटी व शर्ती :-

- पुरवठादार संस्थेने झेरोक्स मशीन कार्यालयामधील सर्व कार्यरत डेस्कटॉप संगणकांना आज्ञावलीद्वारे (Internet LAN) जोडणी करून सदर यंत्रणा कार्यान्वित करून द्यावी.
- पुरवठादार संस्थेला दुरध्वनीद्वारे तक्रार नोंदविल्यास २४ तासामध्ये झेरॉक्स मशीन तंत्रज्ञ हजर होऊन तांत्रिक दोष दूर करावा लागेल. किंवा सदोष झेरॉक्स मशीन ऐवजी तात्काळ दुसरी झेरॉक्स मशीन या कार्यालयास उपलब्ध करून कार्यान्वित करून द्यावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

- पुरवठादार संस्थेने दरपत्रकामध्ये सादर केलेल्या न्यूनतम दरकरारामध्ये झेरॉक्स मशीनचे सुटे भाग,सीलबंद नवीन टोनर व इतर अनुषंगिक देखभाल व दुरुस्ती यावर होणारा खर्च समाविष्ट राहील. तसेच या अनुषंगाचे भविष्यात कोणतीही अतिरिक्त दरवाढ व त्याचे देयक अनुज्ञेय राहणार नाही.
- पुरवठादार संस्थेने एकूण छपाई प्रतींची व्यवस्थित नोंद घेऊनच त्रैमासिक पद्धतीनेच देयक या कार्यालयास सादर करावे.
- पुरवठादार संस्थेने आपल्या लेटरहेडवर शिक्का व स्वाक्षरीसह उपरोक्त दिलेल्या दरकरार नमुण्यानुसारच दर वाणिज्य लिफाफ्यात भरावे. तसेच पॅन कार्ड, वस्तू व सेवाकर प्रमाणपत्र,उद्योग आधार प्रमाणपत्र, गुमास्ता प्रमाणपत्र, कामाचा अनुभव पत्र शिक्का व स्वाक्षरीसह तांत्रिक लिफाफ्यात भरावे.
- पुरवठादार संस्थेस अटी व शर्ती मान्य असल्याचा रु.५००/- स्टॅप पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.
- पुरवठादार संस्थेच्या खात्यात देयकाची रक्कम त्रैमासिक पद्धतीनेच संगणक प्रणालीद्वारेच जमा केली जाईल.
- वार्षिक सेवासंविदा दरकरारामधील अटी व शर्तीमध्ये कोणत्याही टप्प्यावर सुधारणा करण्याचे अथवा वार्षिक सेवा संविदा दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अथवा रद्द करण्याचे अधिकार नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा,मुंबई हे राखून ठेवत आहेत.
- पुरवठादार संस्थेच्या सेवेत त्रुटी आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदर वार्षिक सेवासंविधा दरकरार रद्द करण्याचा अधिकार नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा,मुंबई हे राखून ठेवत आहेत.
- ~~पुरवठादार काही शंका असल्यास त्यांनी कार्यालयीन वेळेत (२ व ५) कार्यालयात येऊन माहिती घेता येईल - (दरकराराच्या कालावधीत)~~

आपला,

(अजय साखरे)
नियंत्रक,
शासकीय परिवहन सेवा, मुंबई

Scanned with OKEN Scanner